महाराष्ट्र शासन

# सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग


सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चाळिसगांव यांचे कार्यालय,
धुळे रोड, चाळिसगांव,
Email:- ar.chalisgaon@coop.maharashtra.gov.in


जा.क्र.आस्थापना/मा.अ.२००५/कलम ४/माहिती प्रकट/सन २०१९ दिनांक १/०७/२०१९

प्रति,
मा. विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक

**विषय** :- सार्वजनिक प्राधिकरणाने स्वतःहुन किंवा सकारात्मक तत्वावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१) (ब) अन्वये माहिती प्रकट करणेबाबत.

**संदर्भ** :- १) माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४(१).
२) आपले कार्यालयाकडील पत्र जा.क्र.स.आ.१५/सर्वसाधारण/मा.अ.२००५ कलम ४(१) अंमल/२०१६/४३७, दिनांक २०/०५/२०१६.
३) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.संवका/मा.अ. २००५ कलम ४(१) अंमल/२०१६, दिनांक २८/०६/२०१६.
४) आपले कार्यालयाकडील पत्र जा.क्र.स.आ.१५/सर्वसाधारण/मा.अ.२००५/कलम ४(१)(ड)/२०१७/१०२८ दिनांक ०२/०२/२०१७.
५) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.संवका/सर्वसाधारण/मा.अ.अ.२००५ कलम ४(१) (बी)/२०१७, दिनांक ०९/०२/२०१७ ची दोन पत्रे.
६) आपले कार्यालयाकडील प्रत्र जा.क्र.संवका/मा.अ.२००५/कलम ४/माहिती प्रकट/सन २०१७ दिनांकः- २२/१२/२०१७

वरील संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की,

२/- संदर्भ क्र. १ ते ५ अन्वये या कार्यालयाची माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१) अन्वये प्रकट करावयाची १ ते १७ मुद्दयांबाबतची माहिती दरवर्षी दिनांक १ जानेवारी व दिनांक १ जुलै असे वर्षातून किमान दोन वेळा अदयावत करुन प्रसिध्द करणेबाबत सूचित केलेले आहे.

त्यानुसार या कार्यालयाची दिनांक ०१ जुलै २०१९ रोजीची अदयावत माहिती सोबत जोडून सविनय सादर करण्यात येत आहे.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, चाळिसगांव

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर**
१.मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुंबई
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, चाळिसगांव

Scanned by CamScanner

मुद्दा क्रमांक :- १ (एक)

## कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चाळिसगांव जि. जळगांव यांचे नियंत्रणाखालील विषय :-

- प्रशासन.
- तालुक्यातील सहकारी संस्थांवर नियंत्रण तसेच वैधानिक कार्यवाही
- तालुक्यातील सर्व नागरी सहकारी बँक व पतसंस्थांवर नियंत्रण तसेच वैधानिक कार्यवाही.
- तालुक्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका.
- आपल्या अधिनस्त तालुक्यातील सहकारी संस्था कार्यालयावर नियंत्रण.
- तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती कामकाज .
- तालुक्यातील देखरेख संघ कामकाज.
- तालुक्यातील हातमाग व यंत्रमाग सहकारी संस्था, कामकाज.
- शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे.
- मानिव अभिहस्तांतरणासाठी आलेल्या प्रकरणांवर निर्णय घेणे.

मुद्दा क्रमांक :-२ (दोन)- अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये

जिल्हा उपनिबंधक व अधिनस्त अधिकारी यांच्या जबाबदा-या

| अधिकार पद | प्रशासनिक अधिकार | कायदा/नियम/आदेश/राजपत्र |
|---|---|---|
| सहाय्यक निबंधक व त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी | सहकारी संस्था व उपविधी नोंदणी व उपविधीतील सुधारणा | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ , कलम १३ व १४ व नियम ४,५,१२ व १३ |
| | संस्थांचे वर्गीकरण करणे आणि त्यांची यादी प्रसिध्द करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १२(३ अ) व नियम १० |
| | संस्थांचे एकीकरण, हस्तांतर, विभागणी यांस मंजुरी देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १७ व १८ नियम १६ व १७ |
| | संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १९ व नियम १८ |
| | संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २० |
| | संस्थेची नोंदणी रद्द करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २१ |
| | एखादया संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तिने केलेले अपिल निकालात काढणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २३ |
| | एखादया सदस्याची संस्थेतून हकालपट्टी करण्याचे ठरावास मान्यता देण्यास किंवा सदस्यास पुनःसदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास संमती देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३५ व नियम २८ व २९ |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४४ व नियम ४२ |
| | संस्थेचा निधी विशिष्ट रितीने गुंतविण्या बदल आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७० व नियम ५५ |
| | एखादया संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या समितीवरील सदस्यांची कमाल संख्या निश्चित करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ |
| | अधिसूचित संस्थाच्या निवडणुकी घेणे व निवडणुक घेण्याचा खर्च विहीत रितीने वसुल करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ ए, क क व नियम ५६ अ |
| | मुदत संपण्यापुर्वी समितीने निवडणूक न घेतल्यास निबंधकास स्वतःस संस्थेचे व्यवस्थापन आपलेकडे घेता येईल किंवा प्रशासकाची नेमणूक करता येईल. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ ह |
| | वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यास किंवा तिच्या पुढे ताळेबंद ठेवण्यांच्या बाबतीत कसूर करणारा किंवा विशेष साधारण सभा बोलविण्यात कसूर करणारा अधिकारी किंवा समितीचा सदस्य यास निवडणूकीस अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास दंड करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ व ७६ |
| | वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ |
| | संस्थेतील विशेष सर्वसाधारण सभा बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ |
| | समितीच्या नवीन समितीच्या सदस्याची किंवा प्रशासकाची नेमणूक करणे/बदलणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ |
| | समिती काढून टाकणे आणि नविन समिती किंवा प्रशासक नेमणे, सभासद काढून टाकणे व नेमणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ |
| | संस्थेस बंधनकारक असतील अशी कामे करुन घेणे आणि त्यास कसुर करण्यास दंड करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ |
| | संस्थेचे दप्तर किंवा मिळकतीचा ताबा घेणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८० |
| | संस्थेचे दरवर्षी हिशोब तपासणे किंवा तपासून घेणे व हिशोबातील दोष सुधारण्याचा संस्थेस आदेश देणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व ८२ |
| | संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती याबाबत चौकशी करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ |
| | चौकशी किंवा तपासणी यांचे खर्चा बद्दल हुकुम करणे आणि ती वसूल करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८५ व ८६ |
| | संस्थेची पुस्तके तपासणी किंवा तपासून घेणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८४ |
| | संस्थेच्या कारभाराचे निरीक्षण करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ |
| | विविक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची वसुली करणे | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ |
| | सहकारी संस्थेस व्यवहार बंद करणे तसेच ऋण परिशोधकाची नेमणूक | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ व १०३ |

मुद्दा क्रमांक

Scanned by CamScanner

मुद्दा क्रमांक :-३ (तीन) -

## निर्णय घेण्याच्या प्रक्रियेस अनुसरण्यात येणारी
## कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली

### सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चाळिसगांव जि. जळगांव यांची कार्यक्षेत्र रचना

### सहकार खात्याची क्षेत्रीय रचना

सचिव (सहकार) (मंत्रालय स्तर)

↓

सहकार आयुक्त (राज्य मुख्यालय स्तर)

↓

विभागीय सहनिबंधक (विभाग स्तर)

↓

जिल्हा उपनिबंधक , (जिल्हा स्तर)

↓

तालुका/उप/सहाय्यक निबंधक (तालुका स्तर)

↓

- सहकार अधिकारी प्रथम श्रेणी
- सहकार अधिकारी व्दितीय श्रेणी
- सहाय्यक सहकार अधिकारी
- लिपीक

मुद्दा क्रमांक :-४ (चार) -

स्वतः ची कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके

आणि

Scanned by CamScanner

मुद्दा क्रमांक :-५ (पाच) -

त्यांच्याकडील असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांचे कार्य पार पाडणेसाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनिमय, सुचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख.

→ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये असलेल्या जबाबदाऱ्या.

मुद्दा क्रमांक :-६(सहा)- त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विविरण

वर्गीकरण प्रकार अ (कायम स्वरुपी ठेवावयाची कागदपत्रे)

- सहकारी संस्थेची नोंदणी व पोटनियम नोंदणी धारिका
- विभागीय सूचना पुस्तिका
- स्थायी आदेश धारिका
- शासन निर्णय
- भौगोलिक बदल आदेश (नवीन कार्यालय स्थापन करणे, बदल्या इ.)
- अभिलेख सुची
- निवाडा व डिक्री ओदश
- जडवस्तू संग्रह नोंदवही
- क्रक्ष.च.नोंदवही
- ग्रेडेशन यादी
- म.स.सं.नियम १९६१ चे नियम ३० अनुसार सर्व कागदपत्रे
- सर्व वैधानिक आदेश
- बाजार क्षेत्र जाहिर करणे, नियम आदेश व बाजार समितीच्या विधी व उपविधी
- कर्मचारी नियुक्ती आदेश धारिका (वर्ग-४) सेवा नियम नमुनेदार उपविधी
- नोंदणी क्रमांक वितरण
- नमुनेदार उपविधी (सर्व प्रकार)
- पोटनियम दुरूस्ती व संस्थेच्या नावात बदल
- सावकारी कायदा ,अधिनियम व परिपत्रके
- सावकारी परवाना नोंदवही (नमुना १ व नियम ३)
- सावकारी परवानाधारक नोंदवही ( कलम ७)
- सावकारी परवाना रद्द आदेश (कलम ११)

वर्गीकरण प्रकार ब (३५ वर्षापर्यंत ठेवायाची कागदपत्रे)

- लेखापरिक्षण अहवाल.
- पोटनियम दुरुस्ती प्रकरणे.
- कार्यक्रम अंदाज पुस्तिका.
- नियुक्ती आदेश.
- पेन्शन प्रकरणे (सर्व).
- सेवापुस्तके.
- सावकारी परवाना वितरण, रद्द करणे, नोंदणी अर्ज रद्द करणे.

वर्गीकरण प्रकार क (५ वर्षापर्यंत ठेवावयाची क कागदपत्रे)

- सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे
- विधानसभा/विधान परिषद प्रश्न व उत्तरे, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, आश्वासने
- कामकाज वाटप आदेश

Scanned by CamScanner

- तपासणी अहवाल
- आवक-जावक नोंदवही
- लेखन सामुग्री मागणीपत्र
- बदली आदेश
- बढती आदेश
- नियतकालीन विवरणपत्र सादरीकरण नोंदवही
- जी.डी.सी.ए.व खाते परिक्षा निकालपत्र
- परिक्षा नियोजन धारिका (वेळापत्रक, हजेरीपत्रक)
- नियोजन अंदाजपत्रक
- कार्यभार हस्तांतरण
- प्रमाणित लेखापरिक्षक यांना वाटप केलेल्या संस्थांचे आदेश
- मजुर संस्थां कामकाज वाटप

<u>मुद्दा क्रमांकः-७(सात) -</u> आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्यांची अमंलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनीमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल.

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सूचना तसेच कायदयातील दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. अंतिम मान्यता विधीमंडळाद्वारे होते.

<u>मुद्दा क्रमांकः-८(आठ)-</u>

आपला एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे परिशिष्टांचे, समित्यांच आणि अन्य निकालाचे विवरण आणि त्या मंडळाच्या, परिषदाच्या समित्याच्या आणि अन्य निकालाच्या बैठकीत लोकासाठी खुला आहेत किंवा कसे अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.

तालुक्यातील अडचणीतील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी ठोस कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाहीस गती येण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाकडील शासननिर्णय क्रमांक युआरबी -१५०७/शिकाणा/प्र.क्र. ४७/७-स, दिनांक १३/०८/२००८ अन्वये जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समिती मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कामकाज करते.

महाराष्ट्र राज्य सावकारीच्या व्यवहाराचे नियमनाकरिता महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा कायदा दिनांक ४ एप्रिल २०१४ रोजीच्या अधिसुचनेव्दारे प्रसिध्द झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक ९ सप्टेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेव्दारे ज्या क्षेत्रामध्ये निबंधक आपल्या अधिकाराचा वापर करतील व आपली कर्तव्य पार पाडतील ते क्षेत्र म्हणून निश्चित केले आहे. सावकाराने दिलेल्या कर्जावर एका वर्षात किती व्याजदर आकारवयाचा याबाबतची महाराष्ट्र शासनाने १६ सप्टेंबर २०१४ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. सदर कायदयांतर्गत ज्या क्षेत्रात बेकायदेशीर सावकारी व्यवसाय केला जातो त्या क्षेत्रातील सावकाराविरुध्द कलम १६ अन्वये कारवाई करुन सावकारी बाबतची सर्व कागदपत्रे जप्त करण्याचा अधिकार निबंधकांना दिला आहे. संपादित केलेल्या स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार कलम १८ नुसार निबंधकांना दिला आहे. सावकारी संदर्भात प्राप्त होणा-या लेखी/ऑनलाईन तक्रारीवर चौकशी करुन कार्यवाही करण्याचा अधिकार निबंधकांना आहे.

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमनाबावत) अधिनियम १९६३ चे कलम ११ अन्वये गृहनिर्माण संस्थांनी त्यांचे ७/१२ उतारा, प्रॉपर्टी कार्डवर जे प्रवर्तक,विकसक, जमिन मालक नांव लावून देणेस कसूर करतात अशा व्यक्तीं विरुध्द या कार्यालयाकडे दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी करणे व आदेश पारीत करण्याचे कामकाज चालविले जाते. वैधानिक गृहनिर्माण संस्थांनी अर्ज दाखल केल्यानंतर दोन महिन्यांचे आत अर्जाशी संबंधित त्रुटींची पुर्तता संस्थेस कळविणे, अथवा अर्जामध्ये त्रुटी नसल्यास सुनावणी नोटीस निर्गमित करणे आवश्यक असून अशा विहीत कालावधीत अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही केली जाते. अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आत अर्जावर निर्णय घेणे आवश्यक असून या कार्यालयास प्राप्त

Scanned by CamScanner

झालेल्या अर्जावर विहीत कालावधीत निर्णय घेतला जातो. मानिव अभिहस्तांतरणाच्या प्रक्रियेत सुलभता यावी म्हणून शासनाने दिनांक १ मे २०१४ पासून ऑनलाईन प्रणालीव्दारे मानिव अभिहस्तांतरणाचे अर्ज स्विकारण्यात यावे अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत त्यानुसार शासनाने ध्ध्ध.क्ष्ड्डद्मड्ढदद्ध.क्ष्ड्डद्मड्ढण्द्ढड्ड.ड्डदृ.त्द या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली असुन ऑनलाईन अर्ज भरणेबाबतच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती या वेबसाईटवर उपलब्ध करुन दिलेली आहे.

**मुद्दा क्रमांक :- ९ (नऊ)-** अधिका-यांची व कर्मचा-यांची निर्देशिका

**आणि**

**मुद्दा क्रमांक :-१०(दहा)-**

आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन,तसेच प्राधिकरणाच्या विनियमामध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसारभरपाई देण्याची पध्दत

| | | |
|---|---|---|
| १) | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था | रु.८०,०००/- एस -२० |
| २) | सहकार अधिकारी (प्र.श्रे.) | रु.६५९००/- एस -१४ |
| ३) | सहकार अधिकारी (व्दी.श्रे.) | रु.४७६००/- एस -१३ |
| ४) | मुख्यलिपीक | रु.५३६००/- एस -१३ |
| ५) | सहाय्यक सहकारी अधिकारी | रु.३९८००/- एस -८ |
| ६) | कनिष्ठ लिपीक, शासकीय प्रतवारीकार | रु.२७६००/- एस -८ |
| ७) | शिपाई / प्रतवारी परिचर (वर्ग-४) | रु.२८२००/- एस -३ |

**मुद्दा क्रमांक :-११(अकरा)-**

सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमूण दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमांचा अहवाल.

**वार्षिक योजना सन २०१८-१९ माहे. मार्च, २०१९ अखेर झालेला खर्च.**

आणि

**मुद्दा क्रमांक :-१२(बारा)-**

अर्थसहाय्य

कार्यक्रमांच्या अमंलबजावणीची रित तसेच वाटप केलेल्या रक्कमा आणि अशा कार्यक्रमाच्या लाभ धारकांचा तपशील

**आणि**

Scanned by CamScanner

मुद्दा क्रमांक :-१३(तेरा)-

ज्या व्यक्तींना सवलती ,परवाने व प्राधिकार पत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.

जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयमार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती.

सन २०१८-१९ (रु. लाखात)

| अ.क | गौणशिर्ष, उपशिर्ष, प्राथमिक घटक | सन २०१८-१९ची अंतिम सुधारीत अर्थसंकल्पीय तरतुद | माहे मार्च, १९ अखेर झालेला खर्च. | समर्पित बचत झाल्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १०७ (०२) (०४) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (व्याज सवलत) (जनरल)२४२५१००९ | --- | --- | --- |
| २ | १०७ (०२) (०४) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (व्याज सवलत) (जनरल)२४२५१८१३ | --- | --- | --- |
| ३ | १०७ (०२) (०४) डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (विघयो)२४२५१२२३ | --- | --- | --- |
| ४ | डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (आउयो)२४२५११३४ | --- | --- | --- |
| ५ | डॉ.पंजाबराव देशमुख पिक प्रोत्साहन योजना (आदीवासी क्षेत्राबाहेरील) २४२५११४३ | | | |
| ६ | १०२ (०२) (०२) गट पातळीवरील ग्रामिण कारागीरांच्या (बलुतेदार) औद्योगिक सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान.४८५१०८५६ | --- | --- | --- |
| ७ | १०८ (०३) (०८) अनुसुचित व नवबौध्द सभासदांना सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीकरीता अर्थसहाय्य. (२४२५०५८६) | --- | --- | --- |
| ८ | १०८ (०३) (०४) अनुसुचित व नवबौध्द सभासदांना सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीकरीता कर्ज. (६४२५०१६२) | --- | --- | --- |
| ९ | (०१)(०७) आदिवासी शेतक-यांना सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीकरीता अर्थसहाय्य. (२२२५१५३५) | --- | --- | --- |
| १० | (०१) (०१) आदिवासी शेतक-यांना सहकारी साखर कारखान्यांचे भाग खरेदीकरीता कर्ज. (६२२५००४४) | --- | --- | --- |
| ११ | (०१)(०१) आदिवासी सहकारी संस्थांचे ७ वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्जे (६२२५००४४) | --- | --- | --- |
| | एकुण :- | | --- | --- |

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना.(सर्वसाधारण) (विघयो) व (आदिवासी उपयोजना) |
| अ. | योजना केव्हापासुन कार्यान्वित आहे. | १९९१ |
| ब. | योजनेचा उद्देश व स्वरुप. | या योजनेंतर्गत जे शेतकरी रु.१०००००/-वा त्यापेक्षा कमी पीक कर्ज घेतात आणि त्या कर्जांची व्याजासह संपुर्ण परतफेड ३० जुनच्या आत करतात त्या शेतक-याना भरणा केलेल्या व्याजापैकी ३ टक्के व्याज अनुदान तसेच रु.१००००१/- रु.३०००००/- पर्यंत कर्ज घेणा-या शेतक-यांना १ टक्के व्याज सवलत पीक उत्पादन प्रोत्साहनासाठी शासनाकडुन देण्यात येते. शेतक-यांच्या पीक कर्जाची वेळेवर परतफेड होऊन या योजनेचा जास्तीत जास्त शेतक-यांना लाभ मिळावा या योजनेचा उद्देश आहे. शिवाय ही व्याज सवलत योजना असल्यामुळे शेतक-यांना पीक उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रोत्साहन मिळते. |
| क. | लाभार्थी. | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार सभासद. |
| ड. | अर्ज कोणाकडे करावयाचा. | उप/ सहाय्यक निबंधक. |
| इ. | मंजुरीचे अधिकार. | जिल्हा उपनिबंधक. |

Scanned by CamScanner

**मुद्दा क्रमांक :-१४ (चौदा):-**

इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपात उपलब्ध असलेल्या किंवा त्यांच्याकडे असलेल्या माहितीच्या संबधातील तपशील

आणि

**मुद्दा क्रमांक :-१५(पंधरा):-**

माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असणा-या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था जळगांव या कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध
असणा-या सुविधांचा तपशील प्रसिध्द केलेला आहे.

**मुद्दा क्रमांक :-१६(सोळा):-**

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चाळिसगांव जि. जळगांव कार्यालयातील शासकीय जनमाहिती अधिकारी यांची डिरेक्टरी**

| अ.क्र | कार्यालयाचे नाव पत्ता व दुरध्वनी क्रमांक | सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | जनमाहिती अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकारी यांचे नाव,पदनाम व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चाळिसगाव, धुळेरोड, चाळिसगांव ता. चाळिसगांव जि. जळगाव | शाखाप्रमुख (संबधीत कर्मचारी) | १.श्री व्हीएमजगताप, सहकार अधिरी (प्र.श्रे.) | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मुसावळ जि. जळगांव |

**मुद्दा क्रमांक :-१७ (सतरा):-**

विहीत करण्यात येईल अशी माहिती.

वार्षिक माहिती संबंधी या कार्यालयाचे सांख्यिकी शाखा कामकाजाचे स्वरुप खालीलप्रमाणे :-

१. वा-२४/□पेंडिक्स अे -

दरवर्षी माहे मार्च अखेर अस्तित्वात असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या निश्चीत करणे, वर्षाअखेर नवीन नोंदणी झालेल्या/पुर्नजिवन झालेल्या/अवसायानात घेतलेल्या रद्द केलेल्या संस्थांची संख्या प्रत्येक तालुक्याकडून घेऊन जिल्हयाची एकत्रित संख्या मुख्य कार्यालयास सादर करणे.

२. वार्षिक माहिती तक्ते १० ते ५१ (ऋड छ्रुख्क्) सादर करणे.

दरवर्षी वा-२४ नुसार निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची वार्षिक माहिती संस्थांच्या प्रकारनिहाय सर्व तालुक्याकडून प्राप्त करुन घेऊन जिल्हयाचे एकत्रिकरण करुन माहिती मुख्य कार्यालय, पुणे यांना सादर करण्यात येते.

३. तालुक्यातील सामाजिक व आर्थिक समालोचन/राज्य सांख्यिकी गोषवार/तालुका निवडक निर्देशांक :-

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन/तालुका निवडक निर्देशांक हे प्रकाशन दरवर्षी जिल्हा सांख्यिकी गोषवारा हे प्रकाशन अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयातर्फे प्रकाशीत करण्यात येते. सदर प्रकाशनाकरीता आवश्यक असलेली माहिती वार्षिक माहितीच्या तक्त्यांच्या आधारे किंवा आवश्यक्यता वाटल्यास तालुका कार्यालयाकडून/लेखापरिक्षण यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन जिल्हा सांख्यिकी कार्यालयास सादर केली जाते.

Scanned by CamScanner

४. इतर :-

**मा.**मुख्य कार्यालय, पुणे तसेच मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नाशिक,मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव कार्यालयाकडून मागविलेली सांख्यिकी विषयक माहिती सादर करणे. तसेच खाजगी संस्था/ व्यक्तिंनी मागितलेली सांख्यिकी माहिती/आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणे.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, चाळिसगांव जि. जळगांव

Scanned by CamScanner